# बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे ऑक्टोबर – २०१८

**L.T. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई**

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | L.T. मार्ग पोलीस ठाणे गुरक्र.२७०/२००८ कलम ३६४(अ), ३४ भादवि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १२/१२/२००८ रोजी ते दिनांक १५/१२/२००८ रोजीचे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | शहाविरी इमारतीसमोर, आर.एस.सप्रे मार्ग, मुंबई.०२ |
| ४ | **फिर्यादी** | श्री. यशवंत वासुदेव पाटील |
| ५ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | —— |
| ६ | **हस्तगत मालमत्ता** | १) स्कॉर्पिओ गाडी क्र. केएल २५ अे २३५५<br>२) लाल रंगाची नायलॉन रस्सी, एक सफेद चिकटपट्टी रोल, पातळ टॉवेलचे पांढऱ्या रंगाचे तीन लांब तुकडे, एक क्रेप्ट बॅडेंज, एव्हरेस्ट कंपनीचे लाल मिरची पावडरचे फोडलेले पाकीट.<br>३) सिरीज सुईसह दोन इंजेक्शन, एक सिरीज सुई शिवाय, एक कोटामिन हॉड्रोक्लोराईट इंजेक्शन दोन डायझेपाम (Calmpose) इंजेक्शन.<br>४) Royal Sundaram Alliance Insurance Company Ltd.ची विजयकुमार नांव असलेले पावती व इत्यादी. |
| ७ | **हस्तगत हत्यार** | —— |
| ८ | **आरोपी अटक** | १) रमेशकुमार गोपालकृष्णन नायर.<br>२) गोपेश गोपिनाथन नायर,<br>३) कादरमिरज अमहंद शेख,<br>४) राधाकृष्णन भास्कर पिल्ल,<br>**अटक दिनांक १५/१२/२००८ रोजी** |

L.T. मार्ग पोलीस ठाणे गुरक्र.२७०/२००८ कलम ३६४(अ), ३४ भादवि. या गुन्हयात दिनांक १२/१२/२००८ रोजी ते दिनांक १५/१२/२००८ रोजीचे दरम्यान शहाविरी इमारतीसमोर, आर.एस.सप्रे मार्ग, मुंबई.०२. याठिकाणी आरोपी नामे रमेश नायर व त्याचे साथीदारांनी इसम नामे अरविंद बाबूराव सांगावे याचेकडे रू.२५,००,०००/– ची मागणी करून सदरची रक्कम खंडणी स्वरूपात वसुल करण्याकरीता त्यास पळवून नेले याबाबत फिर्यादी नामे श्री. यशवंत वासुदेव पाटील याने दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक १५/१२/२००८ रोजी नमुदप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

L.T. मार्ग पोलीस ठाणे च्या पथकाने मानवी कौशल्य वापरून रू.२५,००,०००/– ची मागणी करून सदरची रक्कम खंडणी स्वरूपात वसुल करण्याकरीता अपहरण करणारे आरोपी क्र.१) रमेशकुमार गोपालकृष्णन नायर, २) गोपेश गोपिनाथन नायर, ३) कादरमिरज अमहंद शेख, व ४) राधाकृष्णन भास्कर पिल्ले यांना दिनांक १५/१२/२००८ रोजी कौशल्याने अटक केले. अटक आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास करुन आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक १९/०३/२००९ रोजी मा. महानगर दंडाधिकारी, २८ वे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई येथे कोर्ट केस क्र.२६९/पीडब्ल्यू/२००९ अन्वये दोषारोप पत्र सादर केले तसेच सदर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळवुन मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे दि.३१/०३/२००९ रोजी सेशन केस क्र.२४७/२००९ अन्वये सदरचा गुन्हा वर्ग करण्यात आला.

सदर पथकाने मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा विहित वेळेत सादर केला. यातील अटक आरोपीतांनी वेळोवेळी त्यांचे जामिनाकरीता मा. न्यायालयात विनंती अर्ज सादर केले असता, सदर

थकाने मा. न्यायालयात विहित वेळेत आपले म्हणणे सादर करून आरोपीतांचे जामिनाबाबत तिव्र आक्षेप घेतला तसेच L.T. मार्ग पोलीस ठाणेचे नियुक्त पैरवी अधिकारी व अंमलदार यांनीही आरोपीतांना जामिन मिळाल्यास ते खटल्याच्या सुनावणीकरीता उपलब्ध होणार नाहीत अथवा फरार होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आणुन दिले. तसेच सदर पथकाने ०६ अप्रत्यक्षदर्शी साक्षीदार/पंच व इतर पुरक साक्षीदार सादर करून **दिनांक २६/१०/२०१८ रोजी** मा. सत्र न्यायालय, मुंबई यांनी आरोपी क्र. १) रमेशकुमार गोपालकृष्णन नायर, २) गोपेश गोपिनाथन नायर व ३) कादरमिरज अहंमद शेख यांना खालील प्रमाणे शिक्षा दिलेली आहे.

मा. न्यायालयाने अटक **आ.क्र.१) रमेशकुमार गोपालकृष्णन नायर, २) गोपेश गोपिनाथन नायर व ३) कादरमिरज अहंमद शेख** यांना प्रत्येकी दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :—

**अ)** भादवि. कलम ३६४(अ) सह ३४ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.१०,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०६ महिने साधी कैद,

तसेच अटक आरोपीत क्र. ४) राधाकृष्णन भास्कर पिल्ले याचे विरूध्दचा निकाल मा. न्यायालयाने सुप्त दप्तरी दाखल करण्याबाबत निकालपत्रात आदेशित केलेले आहे.

L.T. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई च्या पथकाने मानवी कौशल्याचा वापर करून मोटार वाहनातुन अपहरण करून केरळ येथे नेवून अपहृत व्यक्तीकडे रू.२५,००,०००/— ची खंडणी मागुन, मागितलेली रक्कम न दिल्यास जिवे ठार मारण्याची धमकी देणाऱ्या चार आरोपीतांना अपहरण करण्याकरीता वापरण्यात आलेल्या मो/कार व हत्यारांसह अटक करून त्यांचेविरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोप पत्र दाखल केले व मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपींना शिक्षा झालेली आहे

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे ऑक्टोबर — २०१८ चे **बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**L.T. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार :—**

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे | अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक सुरेश शिवनाथ आव्हाड | ४ | पो.ह.क्र.२७१८३/ भाऊसाहेब पांडूरंग गोमासे |
| २ | पोलीस निरीक्षक संजय राजाराम मोहिते | ५ | पो.ह.क्र.२९९९३/ तुकाराम भागू संकपाळ |
| ३ | पोलीस उप निरीक्षक अभिजीत नंदकुमार काळे | ६ | पो.ना.क्र.९९०४३४/पंढरीनाथ सिताराम आडगा |

—— ००० ——